खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – १५/०२/२०१७

प्रेसनोट

**मोपेडची डिकी उघडुन ऐवज लंपास करणारी टोळी जेरबंद दोन अल्पवयीन मुलांसह चौघेजण जेरबंद पाऊण लाखाचा माल हस्तगत**

श्री अशोक नेमीचंद जैन वय – ६१ रा – गंगाधाम नगर अचलनगर को ऑप हौसींग सोसायटी कुमार पृथ्वी कोंढवा खुर्द पुणे हे दिनांक – ०९/०५/२०१६ रोजी रात्री ०८/४० ते ०९/१० वा चे दरम्यान नेहरु रोड कल्पतरु सोसायटी गंज पेठ पुणे याठिकाणी त्यांचे नातेवाईकाचे दाताच्या दवाखाण्याचे उदघाटणासाठी आले होते त्यांनी त्यांची ज्युपीटर मोपेड नंबर – एमएच१२/एलके७४३२ ही मोपेड पार्क करुन कार्यक्रमासाठी गेले असता अज्ञात चोरटयाने मोपेडची डिकी कशाचेतरी सहाय्याने उघडुन डिकीमधील रोख रक्कम, मोबाईल फोन व इतर कागदपत्र असलेली बॅग चोरुन नेली होती त्याबाबत त्यांनी खडक पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिलेली आहे.

अशाप्रकारे दुचाकी मोपेड गाडयांची डिकी उघडुन त्यामधील ऐवज चोरी करण्याचे प्रकार पुणे शहरात घडलेले असल्याने त्याबाबत खडक पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी गुन्हयांचा तपास करत असताना पोलीस कर्मचारी संदिप कांबळे यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की अशाप्रकारे गुन्हे करण्याची सवय असलेली तीन ते चार मुले चोरी करण्यासाठी प्रेस्टीज चेंबर बाजीराव रोड पुणे याठिकाणी येणार आहेत अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने पोलीसांनी सदरठिकाणी पार्कींग करण्यात येणारे दुचाकी मोपेड स्कुटरजवळ सापळा लावुन पाहणी करत असताना संशयीत १) किरण ऊर्फ सनी कैलास परदेशी वय – २० रा – ५४/२ अरण्येश्वर नगर संतनगर सहकार नगर पुणे २) गणेश ऊर्फ आप्पा दत्तात्रय निवंगुणे वय – १९ रा - ५४/२ अरण्येश्वर नगर संतनगर सहकार नगर पुणे व दोन अल्पवयीन मुलांना मोपेडची टेहळणी करत असताना ताब्यात घेण्यात आलेले आहे.

**संशयीतांना विश्वासात घेवुन त्यांचेकडे सखोल तपास केल्यानंतर संशयीतांपैकी दोन अल्पवयीन मुलांनी डिकीचे लॉक उघडण्याची कला अवगत केली होती व त्यामध्ये ते मास्टर आहेत व ते दोघे डिकीच्या खाली असलेल्या पॅनलचे आतमध्ये हात घालुन लॉक उघडत होते. अशाप्रकारे गुन्हे करणारी टोळी त्यांची टोळी आहे व त्यांनी पुणे शहरामध्ये वेगवेगळया वीस ते बावीस ठिकाणी ॲक्टीव्हा, ज्युपिटर, ॲक्सीस, वेगो सारख्या मोपेड दुचाकीच्या डिकी उघडुन त्यामधील ऐवज चोरल्याचे उघडकीस आलेले आहे.**

**संशयीतांपैकी दोन अल्पवयीन मुलांनी ॲक्टीव्हा, ज्युपिटर, ॲक्सीस, वेगो या सारख्या दुचाकी मोपेड गाडयांचे डिकीचे लॉक उघडण्याची कला अवगत केली आहे व त्यामध्ये ते मास्टर आहेत व ते दोघे डिकीच्या खाली असलेल्या पॅनलचे आतमध्ये हात घालुन लॉक उघडत होते. त्यांचे ताब्यातुन वेगवेगळया गुन्हयातील चोरलेली रोख रक्कम, मोबाईल फोन तसेच एक दुचाकी वाहन असा एकुण पाऊण लाखाचा ऐवज हस्तगत करण्यात आलेला आहे त्यांनी खडक, विश्रामबाग, डेक्कन, शिवाजीनगर, दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे च्या हददीमध्ये गुन्हे केल्याचे सांगीतले आहे त्यांनी एकुण सहा गुन्हे केल्याचे उघडकीस आलेले आहे.**

मा. श्रीमती अे. अेस. बारुळकर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सहावे न्यायालय पुणे यांचे न्यायालयात संशयीत किरण ऊर्फ सनी कैलास परदेशी व गणेश ऊर्फ आप्पा दत्तात्रय निवंगुणे यांना हजर केले असता त्यांना दिनांक – १८/०२/२०१७ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. मा. सुनिल पाटील पिठासन अधिकारी यांचे आदेशान्वये अल्पवयीन मुलांची रवानगी बाल सुधार गृह येरवडा पुणे येथे करण्यात आलेली आहे. आरोपींचे आणखी साथीदार कोण आहेत ? त्यांचे टोळीतील इतर सदस्य कोण आहेत ? त्यांनी अशाप्रकारे दुचाकी वाहनांची डिकी उघडुन त्यामधील ऐवज चोरीचे आणखी कोठे कोठे आणखी गुन्हे केले आहेत काय ? याबाबत पोलीस तपास करत आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. सुधीर हिरेमठ, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. प्रविण कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के व तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड व अनंता व्यवहारे, पोलीस कर्मचारी सहायक पोलीस फौजदार विजय कांबळे, पोहवा सर्फराज शेख, महेंद्र पवार, एकनाथ कंधारे, संदीप कांबळे, रवि लोखंडे व महिला पोलीस शिपाई भाग्यश्री मोहीते यांनी केलेली आहे.